CMYK

सुविचार

ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी धैर्य आणि सातत्य आवश्यक आहे.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



शिराढोणच्या आठवडी बाजारातील कट्ट्यांची दुरवस्था

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 108 ■ बुधवार दि.28 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5



# अवकाळी पावसाने टरबुजांचा लाल चिखल

## अवकाळीचा फटका

आरंभ मराठी | शिराढोण

अत्यल्प पावसाने हंगामा मागून हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून जात असून नैसर्गीक आपत्तीमुळे शिराढोण व परिसरातील शेतकरी मेटाकूटीला आल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे. पावसाळा सुरु होण्याअगोदरच गेल्या सहा दिवसापासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होत आहे. त्यामळे पुन्हा एकदा प्रयोगशील शेतकऱ्याच्या पदरी निराशा आली आहे. शिराढोणसह तालूक्यातील एकुरका, सौंदणा अंबा, वाकडी, घारगांव, बोरगाव, गोविंदपुर, देवधानोरा, नायगाव आदी गांवात सोमवारी (दि.२६) झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने प्रयोगशील शेतक-यांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. पारंपारीक शेतीस फाटा देत एकुरका येथील दिलीप वामनराव शिंदे यांनी तीन लाख रुपये खर्च करून टरबुजाची लागवड केली होती. टरबुजाचा भाव ४ ते ५ रुपये प्रति किलो झाला आहे. शहरांतील व्यापारी टरबुजाचा प्लॉट पाहण्यासाठी येत होते. शिंदे यांनी पिकवलेले टरबूज बाजारात बेभाव का होईना परंतू विकले जाणार होते. मी माझ्या ४ एकर क्षेत्रावर टरबुजाची लागवड केली होती. मागील दोन महिन्यांपासून मोठ्या परिश्रमांतून ही शेती जोपासली होती.

## आमदार कैलास पाटील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर



### आमदार पाटील यांच्याकडून मदतीसाठी प्रशासनाला सूचना

धाराशिव जिल्ह्यात सलग एक आठवड्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. धाराशिव-कळंब मतदार संघाचे आमदार कैलास पाटील यांनी मंगळवारी (दि.२७) शेतकऱ्यांच्या बांधावर जात नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी कळंब तालुक्यातील एकुरगा येथील दिलीप वामन शिंदे यांच्या शेतातील पावसामुळे नुकसान झालेल्या टरबूजाची पाहणी केली. तसेच त्याच परिसरातील श्रीकांत भिसे यांच्या जमीनदोस्त झालेल्या विहिरीची देखील त्यांनी पाहणी केली. या पावसामुळे शेतकऱ्यांचे आंबा, टरबूज, पपई अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले असून, आमदार पाटील यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, तलाठी यांना पंचनामे करून आपत्ती व्यवस्थापनामधून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचा सूचना दिल्या.

# संचमान्यता आणि नवीन शैक्षणिक धोरणांमुळे अनेक शाळा संकटात

## धाराशिव जिल्ह्यातील शिक्षकांच्या ३०० जागा होणार कमी, ६० शिक्षक ठरणार अतिरिक्त

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव -ग्रामीण भागातील वाड्या - वस्तीवरील शिक्षणावर घाला घालणाऱ्या १५ मार्च २०२४ रोजीच्या अन्यायकारक संच मान्यतेमुळे अनेक शाळा बंद पडून हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. संचमान्यता व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शाळांचे अस्तित्व संकटात येणार आहे. आरटीई अधिनियम संपुष्टात येण्याची भीती व्यक्त होत आहे. मागील वर्षभरात विविध शिक्षक संघटनांनी या संचमान्यतेला विरोध दर्शवला, शासनाच्या विरोधात कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या तरीही राज्य शासनाने त्याच संचमान्यतेनुसार शैक्षणिक निर्णय घेण्यास सुरुवात केल्यामुळे शिक्षणा संदर्भात गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.अतिरिक्त शिक्षक व समायोजन यांचा सकारात्मक विचार करून शासनाने मराठी शाळा वाचवण्यासाठी संच मान्यतेत बदल करणे आवश्यक आहे. आरटीई व १९८१ च्या कर्मचारी सेवाशर्ती नियमावलीनुसार प्रत्येक शाळेतील किमान शिक्षक संच निर्धारित करणे आवश्यक आहे. विद्यार्थी संख्येची अट काढून टाकणे गरजेचे आहे. पूर्वीप्रमाणे क्रीडा व कला शिक्षकांना संच मान्यतेत विशेष शिक्षक म्हणून वेगळे स्थान दिले तर कला, क्रीडा शिक्षकांना स्पेशल शिक्षक म्हणून संरक्षण मिळेल असे काही शिक्षकांनीसांगितले.बालकांना २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) दर्जेदार शिक्षण व शिक्षक मिळणे बंधनकारक आहे. परंतु, सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना पाठविण्याचा ट्रेंड खेड्यापाड्यातही वाढत आहे. काही शाळांचा अपवाद सोडला तर मराठी शाळांचा दर्जा ढासळताना दिसत आहे. १५ मार्च २०२४ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयाने विद्यार्थी असूनही शिक्षकांना बाहेर काढण्याचे काम केले जात आहे. पूर्वी ६ वी ते ८ वी ला ३६ विद्यार्थ्यांकरिता तीन शिक्षक होते. मात्र, नवीन संचमान्यतेनुसार पटसंख्या ७८ असणे आवश्यक आहे. ज्या शाळेत २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तेथे शून्य शिक्षक मान्य करण्यात येणार आहेत. तीन भाषा एक शिक्षक, गणित, विज्ञान एक शिक्षक आणि समाजशास्त्राला एक शिक्षक असा नवा पॅटर्न आहे. त्यामुळे हजारो शिक्षकांची पदे कमी होणार आहेत. नवीन संचमान्यतेनुसार भविष्यात ६ वी ते ८ वी करिता दोन शिक्षक राहणार असून, त्यांच्यावर अतिरिक्त तासिकांचा भार वाढणार



आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. संच मान्यतेमुळे एकीकडे अनेक शाळा शून्य शिक्षकी होणार आहेत. तर दुसरीकडे धाराशिव जिल्ह्यात या नियमामुळे शिक्षकांची ३१७ पदे कमी होणार आहेत. तर ६१ शिक्षकांना शाळाच मिळणार नाही. येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणानुसार पूर्व प्राथमिकचे वर्ग शासन मान्यतेने शाळांना जोडणार आहेत. यामुळे अनेक शाळा बंद पडण्याची भीती असून गरिबांच्या मुलांचे शिक्षण धोक्यात येणार आहे. अनेक विद्यार्थ्यांना लांबच्या शाळेत जावे लागेल. संचमान्यतेचा हा मुद्दा येणाऱ्या काळात वादग्रस्त बनणार असून, शिक्षक संघटना आक्रमक होण्याची शक्यता आहे.

### नवीन संचमान्यतेनुसार कमी होणारी शिक्षकांची पदे

प्राथमिक शिक्षक - १४१
विज्ञान - १५
भाषा - ७७
सामाजिक शास्त्र - ७६
एकूण - ३१७

### मराठी शाळा वाचवण्यासाठी बदल आवश्यक

अतिरिक्त शिक्षक व समायोजन यांचा सकारात्मक विचार करून शासनाने मराठी शाळा वाचवण्यासाठी संच मान्यतेत बदल करणे आवश्यक आहे. आरटीई व १९८१ च्या कर्मचारी सेवाशर्ती नियमावलीनुसार प्रत्येक शाळेतील किमान शिक्षक संच निर्धारित करणे आवश्यक आहे. विद्यार्थी संख्येची अट काढून टाकणे गरजेचे आहे. पूर्वीप्रमाणे क्रीडा व कला शिक्षकांना संच मान्यतेत विशेष शिक्षक म्हणून वेगळे स्थान दिले तर कला, क्रीडा शिक्षकांना स्पेशल शिक्षक म्हणून संरक्षण मिळेल असे काही शिक्षकांनी सांगितले.

# अवैध मद्य विरोधी सलग दुसऱ्या दिवशी कारवाई

आरंभ मराठी | धाराशिव

पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.२५) सलग दुसऱ्या दिवशी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत ७ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले सुमारे ५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव,१४९ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ७१ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे २५,४४० रुपये आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात ७ गुन्हे नोंदवण्यात आले.

## नोकरी लावण्याचे आमिष,१५ लाखांची फसवणूक; ४ महिलांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | उमरगा

नोकरी लावण्याचे आमिष दाखवून उमरगा येथील एका महिलेची कोल्हापूर येथील चार महिलांनी पंधरा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली आहे. यासंबधी उमरगा पोलीस ठाण्यात चार महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी निखली बाबुराव खाडे, शोभा संजय कोळी, वैशाली साबळे, छाया उर्फ राजनंदिनी अनिल हंकारे (सर्व रा.घालवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर) यांनी ९ जानेवारी २०२४ ते २८ डिसेंबर २०२४ दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी फोन पे व गुगल पे वरुन फिर्यादी सुजाता मोहन घोडके (वय ३५ वर्षे, रा. शिंदे गल्ली, उमरगा) यांना व त्यांच्या मैत्रिणीला मी पोलीस आहे, मी पीएसआय परीक्षा देतो तसेच मुंबई मेट्रोमध्ये बिपीन सिंग नावाचे अधिकारी व माझे तसेच पोलीस अधिकारांच्या पण ओळखी आहेत. तुम्हाला नोकरी लावतो असे अमिष दाखवून फिर्यादी यांच्या बँक खात्यावरुन १५,१०,८११ रुपये काढून घेवून फसवणुक केली. तसेच आरोपींनी तुझ्यामुळे आमचा मानेलेला भाऊ निखील बाबुराव खाडे याची नोकरी गेली आहे. त्याला तु जिम्मेदार आहेस, तुला आम्ही सोडणार नाही बघुन घेवू असे म्हणून शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

## महिलेवर लैंगिक अत्याचार करून मारहाण

आरंभ मराठी | धाराशिव

महिलेवर लैंगिक अत्याचार करून तिला जातीवाचक शिवीगाळ,मारहाण केल्याची धक्कादायक घटना धाराशिव शहरात घडली आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, एका गावातील ३५ वर्षीय महिला दिनांक २५ मे रोजी दुपारी बारा ते रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास घरी एकटी असताना गावातील एका तरुणाने तिला फोन करून मला तुला भेटायचे आहे असे सांगितले. त्याने त्या महिलेला तू जर मला भेटली नाही तर मी फाशी घेईन असे म्हणून बोलावून घेतले आणि तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. आरोपीने तिला जातीवाचक शिवीगाळ करून दांड्याने मारहाण केली. पिडीतेने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१), १२६(२),११८(१), ३५२, ३५१(२),३(५) सह अ.जा.ज.प्र.का. कलम ३(१)(ई),(आर)(एस) (डब्ल्यु ()() अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## अवकाळी पावसाने शेतकऱ्याचा उडीद पाण्यात

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील मसला खुर्द येथे अवकाळी पावसामुळे बबन विठ्ठल वीर यांच्या शेतातील काढणीस आलेला उडीद पाण्यात गेल्याने वीर यांच्या काढण्यास आलेल्या उडदाचे नुकसान झाले आहे. बबन वीर हे यांना साडेचार एकर शेती असुन त्यातील एक एकरमध्ये उन्हाळी उडीदाची पेरणी केली होती. त्यानंतर आंतरमशागत फवारणी करत तो जोपासला. यासाठी जवळपास वीस ते बावीस हजार खर्च आला होता. यातुन जवळपास साठ ते सत्तर हजार रुपये उत्पन्न त्यांना अपेक्षीत होते. वीर यांचा उडीद काढणीसाठी आला होता, मात्र अचानक अवकाळी पाऊस सुरु झाला व शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन तो खराब झाला असून यामध्ये शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानीचा पंचनामा करून तात्काळ खरीप पेरणीसाठी शासनाने अर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.



# निम्न तेरणाच्या दुरुस्ती कामाची दुसरी निविदा

### धाराशिव, तुळजापूर, औसा तालुक्याचे सिंचन वाढणार

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने धाराशिव, तुळजापूर आणि औसा तालुक्यातील गावांसाठी महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती कामाची दुसरी निविदाही जाहीर करण्यात आली आहे. सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. तीन तालुक्यातील २३ गावातील साधारणपणे ९ हजार हेक्टर क्षेत्र यामुळे ओलिताखाली येणार आहे. अशक्यप्राय वाटणाऱ्या या दुरुस्तीच्या कामासाठी तत्कालीन उप-मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी निधीची अभूतपूर्व तरतूद केली. अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या या योजनेतील स्थापत्य विभागानंतर आता विद्युत विभागातील कामाचीही निविदा आता जाहीर करण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामही लवकरच सुरु होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.हवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यात निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीसाठी आपल्या आग्रही मागणीनुसार टोकन प्रोव्हिजन अर्थात लेखाशीर्षकात निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे पहिल्यांदा स्थापत्य विभागातील ३२ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेचा टप्पा गाठता आला. स्थापत्य विभागाच्या कामापाठोपाठ आता विद्युत विभागातील १४ कोटी रुपयांच्या कामाचीही निविदा जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष दुरुस्ती कामासही लवकरच सुरुवात होईल. राज्याचे माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी मोठ्या भगीरथ प्रयत्नाने सुरू केलेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपली असल्याचे आपण यापूर्वीच जाहीर केले होते. तुळजापूर, धाराशिव आणि औसा या तीन तालुक्यातील २३ गावांतील साधारणपणे ९ हजार हेक्टर क्षेत्रासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती खर्चास आपल्या महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वीच ११३ कोटी रूपयांची प्रशासकीय मान्यता दिली होती. ठाकरे सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे सुरुवातीच्या अडीच वर्षात या प्रकल्पाच्या दुरुस्ती बाबत काहीच हालचाल झाली नाही. मात्र आपण केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची दखल घेत मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी ११३ कोटी रूपयांच्या दुरुस्ती प्रस्तावास तांत्रिक मान्यता दिली. अशक्यप्राय वाटणाऱ्या या योजनेच्या दुरुस्ती कामास महायुती सरकारच्या माध्यमातून आपण सतत पाठपुरावा करून प्रशासकीय मान्यताही मिळवून घेतली होती.या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना आपण स्वत: नोव्हेंबर २०२२ मध्ये भेटून योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी विनंती केली होती. त्यानुसार तत्कालीन उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी त्याचवेळी जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले होते. पाच टप्प्याची असणारी ही योजना मागील अनेक वर्षे बंद असल्याने स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी या तिन्ही विभागाची दुरुस्ती आवश्यक होती. या तिन्ही विभागांचा सुसमन्वय साधून या तिन्ही विभागांकडून एकत्रित अंदाजपत्रक तयार करून घेणे मोठे जिकिरीचे काम होते. अनेक त्रुटींची पूर्तता करून या तिन्ही विभागाच्या समन्वयाने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती कामासाठी ११३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय किमतीच्या कामास तांत्रिक मान्यता मिळवून घेतली. आणि त्यानंतर सलग पाठपुरावा करून प्रशासकीय मान्यताही मिळवून घेतली. जलसंपदा विभागात कोणत्याही प्रकल्प दुरूस्तीसाठी एकूण तरतुदीच्या कमाल १० टक्के निधी खर्च करता येतो. निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्तीसाठी मात्र तब्बल ११३ कोटी रूपयांची आवश्यकता होती. त्यामुळे या प्रस्तावास खास बाब म्हणून मंजुरी मिळवून घेण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागले. पाठपुरावा सुरूच ठेवला आणि अशक्यप्राय वाटणाऱ्या या महत्वपूर्ण योजनेला आपल्या सर्वांच्या पाठबळावर मोठी गती मिळाली आहे. आता स्थापत्य विभागाच्या कामानंतर विद्युत विभागातील कामाचीही निविदा जाहीर करण्यात आली आहे. लवकरच यांत्रिकी विभागाची निविदाही प्रसिद्ध होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.



# ११ वी प्रवेशास पुन्हा प्रारंभ; प्राधान्यक्रम नोंदणी ३ जूनपर्यंत मुदत,१० जूनला यादी

आरंभ मराठी | धाराशिव

शिक्षण मंडळाची वेबसाइट सुरळीत झाल्याने सांगून अखेर सोमवार (दि. २६) पासून अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. मात्र पुन्हा एकदा सर्व्हर डाऊन च्या समस्येने विद्यार्थ्यांना आणि पालकांना मनस्ताप सहन करावा लागला. नवीन वेळापत्रकानुसार प्रवेशाच्या पहिल्या फेरीत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. या फेरीतील पात्र विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड यादी १० जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

गेल्या आठवड्यात अकरावी प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरण्याचा सराव केला होता. पहिले दोन दिवस म्हणजे मंगळवार (दि.२०) पर्यंत प्राधान्यक्रम नोंदणीचा सराव करण्याची सुविधा देण्यात आली होती. त्यानंतर प्रत्यक्ष ऑनलाइन नोंदणीला बुधवारी (दि.२१) सुरुवात होणार होती. परंतु, तांत्रिक कारणांनी प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी मंडळाची वेबसाइट ठप्प झाल्याने शिक्षण संचालनालयावर सुधारित वेळापत्रकांसह प्रक्रिया राबवण्याची नामुष्की ओढवली. यात विद्यार्थी पालकांनाही प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. त्यानंतर तांत्रिक चुका सुधारून शिक्षण विभागाने वेबसाइट पुन्हा सुरू केली. सोमवार (दि. २६) पासून राज्यभरात पहिल्या फेरीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. या फेरीसाठी विद्यार्थी महाविद्यालयांचे प्राध्यान्यक्रम नोंदवणार आहेत. त्यासाठी ३ जून सायंकाळी ६ पर्यंत मुदत असणार आहे. सोमवारी सकाळी अनेक विद्यार्थ्यांना नोंदणी करताना अडचणी आल्याचे दिसून आले. इंटरनेट कॅफेवर गर्दी झाली होती, तर प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती काढण्यासाठी अनेक केंद्रांवर गर्दी झाली होती. अजूनही बऱ्याच विद्यार्थ्यांना वेबसाईटवर समस्या येत असल्याचे सांगितले जात आहे. परंतु, शिक्षण विभागाने मात्र वेबसाईट सुरळीत चालू असल्याचा दावा केला आहे.



## अनुदानावरील बियाणे: गुरुवारपर्यंत अर्ज करा

आरंभ मराठी | धाराशिव

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत तुर, मुग, उडीद व सोयाबीन पिकांच्या अनुदानावरील बियाणे व पिक प्रात्यक्षिकासाठी गुरूवारपर्यंत (दि.२९) अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित व संकरीत वाणांच्या प्रसाराच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे वितरणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रमाणित बियाणे वितरण या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी किमान ०.२० हे ते कमाल १ हेक्टरपर्यंत मर्यादित आहे. शेतकऱ्यास महाबीज या बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकामार्फत सातबारा उताऱ्याच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रमाणित बियाणे वितरण करण्यात येणार आहे. तुर, मुग, उडीद १० वर्षाच्या आतील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास ५० रू किलो प्रमाणे अनुदान असुन १० वर्षाच्या वरील सुधारित प्रमाणित बियाणे वाणास २५ रू किलो प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

CMYK

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय

बुधवार दि.28 मे 2025

# उपासमारीच्या त्रासाला आपण कधी समजू शकणार?



जगात लाखो लोक दररोज उपासमारीच्या वेदनांसह जगतात. म्हातारपण असो, शारीरिक दुर्बलता, गंभीर आजार, अपंगत्व, अनाथत्व असो किंवा इतर कोणतीही असहाय्यता असो, शेवटच्या श्वासापर्यंत भूक भागवण्यासाठी अन्नधान्याची आवश्यकता असते. दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी संघर्ष करण्यात कित्येकांचे आयुष्य संपून जाते. जगात प्रत्येकाला त्यांच्या अन्नाचा पूर्ण वाटा मिळत नाही, आता अन्नातील पोषक तत्वांचा अभाव ही देखील एक मोठी समस्या आहे. उपासमारीची किंमत खूपच कमी असली, तरीही जगातील लोकसंख्येचा एक मोठा भाग ही किंमत चुकवू शकत नाही. माणूस दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी आणि आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी सतत संघर्ष करतो. उपासमारीमुळे खूप कमी वयातच अनेक निष्पाप जीव जातात. श्रीमंतांचे अन्न महाग असू शकते आणि गरिबांचे अन्न स्वस्त असू शकते, परंतु भूक सर्वांसाठी सारखीच असते. पैसा, पद, देश, प्रतिष्ठा, रंग, देखावा, उच्च-नीच, धर्म-जात काहीही असो, भुकेत कोणताही फरक नाही. ज्यांच्याकडे पुरेसे अन्न उपलब्ध आहे त्यांना अन्नधान्याची खरी किंमत माहित नाही, ते फक्त पैशात त्याची किंमत मोजतात, म्हणूनच कदाचित आपला देश अन्न वाया घालवण्यात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.ज्यांच्याकडे विविध अन्न पर्यायांची मुबलक उपलब्धता असते, ते त्यांच्या आवडीनुसार थोडेसे अन्न खातात आणि उरलेले अन्न सहजपणे फेकून देतात. ज्या दिवशी काही कारणास्तव आपल्याला भूक लागली असूनही अन्न मिळत नाही, त्या दिवशी कोरड्या भाकरीचा तुकडा देखील जगातील सर्वात मोठी संपत्ती वाटते. अन्नाअभावी मोठी लोकसंख्या नरकमय यातनांमध्ये जगते. जन्मापासूनच अन्नाच्या कमतरतेमुळे, मुले सर्वांगीण विकासापासून वंचित असतात आणि तेव्हापासूनच त्यांचे संघर्षाचे जीवन सुरू होते. जबाबदाऱ्यांचे ओझे त्यांच्या निष्पाप खांद्यावर येते आणि या जबाबदाऱ्यांसमोर त्यांचे बालपण, हक्क, न्याय, समानता हे क्षुल्लक वाटू लागतात. मुलाचे बालपण आणि निरागसता हिरावून घेतली जाते, भविष्य अंधकारमय दिसते. अन्नटंचाईशी झुंजणाऱ्या लोकांना अधिकाधिक वाईट परिस्थितींना तोंड द्यावे लागत आहे. त्यांना जे मिळेल ते खाण्यास ते तयार असतात; ते लोकांचे उरलेले उष्टे अन्न, कचरा, गवत आणि अगदी माती देखील खातात. हैतीमध्ये, गरीब लोक चिखलापासून भाकरी बनवून खातात. वेळेवर अन्न न मिळाल्यास भूक थेट आपल्या आरोग्यावर परिणाम करते, त्यामुळे शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारचे नुकसान होते. भूक माणसाला गुन्हे देखील करायला लावते. दरवर्षी २८ मे रोजी जगभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी ''जागतिक भूक दिन'' साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम ''प्रत्येक खाण्यास पात्र आहे'' ही आहे. ही थीम प्रत्येकासाठी पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. जगात सर्वांना खाण्यासाठी पुरेसे अन्न पिकवले जाते, म्हणजे कोणीही उपाशी राहणार नाही, तरीही मोठ्या लोकसंख्येला पुरेशा कॅलरीज आणि पोषक तत्वांचा अभाव आहे, कारण त्यांना निरोगी आहार परवडत नाही, तर दुसरीकडे अन्नाची नासाडी होते. दरवर्षी, नऊ दशलक्ष लोक उपासमारीशी संबंधित कारणांमुळे मरतात; यापैकी बरेच जण ५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले आहेत. एकूण बालमृत्यूंपैकी निम्मे कुपोषणामुळे होतात. जागतिक बँकेच्या मते, जागतिक अन्नधान्याच्या किमतीत फक्त १ टक्के वाढ झाल्याने १ कोटी लोक अत्यंत गरिबीत ढकलले जातात. जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांकानुसार, १८.३ टक्के लोकसंख्या अत्यंत बहुआयामी गरिबीत राहते. ८३.७ टक्के गरीब लोक ग्रामीण भागात राहतात. सर्व गरीब लोकांपैकी सुमारे ७०.७ टक्के लोक उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियातील ग्रामीण भागात राहतात.२०२४ च्या जागतिक भूक निर्देशांकात भारत १२७ देशांपैकी १०५ व्या क्रमांकावर आहे, २७.३ गुणांसह, जे उपासमारीची ''गंभीर'' पातळी दर्शवते. अन्न असुरक्षितता आणि कुपोषणाच्या विद्यमान आव्हानांमुळे निर्माण झालेल्या ''गंभीर'' उपासमारीच्या संकटावर ते प्रकाश टाकते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२१) मधील अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून येते की पाच वर्षांखालील ३५.५ टक्के मुले अविकसित आहेत. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या दक्षिण आशियाई शेजारी देशांनी चांगली कामगिरी केली आणि ते ''मध्यम'' श्रेणीत आले. यूएनईपी च्या अन्न कचरा निर्देशांक अहवाल २०२४ मध्ये भारत जागतिक स्तरावर अन्न कचरा उत्पादकांमध्ये चीन नंतर अव्वल आहे. भारतात दरडोई घरगुती अन्नाची नासाडी दरवर्षी ५५ किलो आहे, देशातील प्रचंड लोकसंख्येमुळे दरवर्षी एकूण ७८ दशलक्ष टन अन्नधान्य वाया जाते.जगातील अन्न सुरक्षा आणि पोषण स्थितीच्या २०२४ च्या आवृत्तीनुसार, २०२३ मध्ये ७१३ ते ७५७ दशलक्ष लोकांना उपासमारीचा सामना करावा लागला, म्हणजे जागतिक स्तरावर ११ पैकी एक आणि आफ्रिकेत पाच पैकी एक. अहवालात असेही अधोरेखित केले आहे की २.३३ अब्ज लोकांना मध्यम किंवा तीव्र अन्न असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे आणि ३.१ अब्जाहून अधिक लोकांना पौष्टिक आहार खरेदी करणे परवडत नाही. सेव्ह द चिल्ड्रन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या विश्लेषणानुसार, २०२४ मध्ये किमान १.८२ कोटी मुले उपासमारीच्या परिस्थितीत जन्माला आली, म्हणजेच दर मिनिटाला अंदाजे ३५ मुले. संघर्ष आणि हवामान संकटाचे हे मिश्रण दरवर्षी किमान ८,००,००० अतिरिक्त मुलांना उपासमारीत ढकलते. संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंत जगातून उपासमार दूर करण्याचे ध्येय ठेवले आहे आणि काही क्षेत्रांमध्ये प्रगती होत असली तरी, गेल्या काही वर्षांपासून एकूण उपासमारीची पातळी स्थिर राहिली आहे. हवामान बदल, संघर्ष आणि आर्थिक असमानता यासारखे घटक समस्या वाढवत आहेत. कन्सर्न वर्ल्डवाइडच्या मते, जर प्रगतीचा सध्याचा वेग असाच राहिला तर उपासमारीची पातळी कमी होण्यासाठी २१६० पर्यंतचा कालावधी लागू शकतो. जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांक २०२४ मध्ये भारत १४३ देशांपैकी १२६ व्या क्रमांकावर आहे. ऑक्सफॅमच्या अहवालात असे दिसून आले आहे की वरच्या १ टक्क्यांच्या उत्पन्नाचा वाटा सातत्याने वाढला आहे. भारतातील वरच्या ५ टक्के लोकांकडे देशाच्या ६० टक्क्यांहून अधिक संपत्ती आहे, तर खालच्या ५० टक्के लोकांचा उत्पन्नाचा वाटा सातत्याने कमी होत आहे. ऑक्सफॅम इंडियाच्या ''सर्व्हायव्हल ऑफ द रिचेस्ट'' अहवाल २०२३ नुसार, भारतातील अब्जाधीशांची एकूण संख्या २०२० मध्ये १०२ होती, ती २०२२ मध्ये १६६ अब्जाधीशांवर पोहोचली आहे, तर भुकेल्या भारतीयांची संख्या १९ कोटींवरून ३५ कोटींवर पोहोचली आहे. वस्तू आणि सेवांवरील उत्पादन शुल्क आणि जीएसटीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, ज्याचा थेट परिणाम बहुतेक गरिबांवर होतो. २०२४ मध्ये भारतातील अब्जाधीशांची एकूण संपत्ती २ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सने वाढली, ज्यामुळे २०४ नवीन अब्जाधीश निर्माण झालेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, २०१९-२०२१ मध्ये भारतात कुपोषित लोकांची संख्या २२४.३ दशलक्ष होती, जी एकूण लोकसंख्येच्या सुमारे १६ टक्के आहे.आजही लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांमध्ये किंवा अनेकांच्या घरी देखील लोक अन्नाने भरलेल्या प्लेट्स फेकून देतात. दुसरीकडे, लोक कचऱ्यात अन्न शोधताना दिसतात. आपले मोठे दुर्दैव आहे की आपण समृद्ध असूनही, देशाचा एक मोठा भाग उपासमारीने ग्रस्त आहे. पोषक तत्वांनी परिपूर्ण शुद्ध अन्न आणि पाणी मिळणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे, परंतु आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य होत नाही. तथापि, जर प्रत्येक संपन्न व्यक्तीने मानवतेच्या आधारावर यासाठी प्रयत्न केले तर सर्वांना पोटभर जेवण मिळणे शक्य होईल. जर प्रत्येक हाताला काम मिळाले तर परिस्थिती बदलू शकते. आपण सर्वांनी उपासमारीचे दुःख समजून घेतले पाहिजे, तरच प्रत्येक मानवाच्या अन्नाची आशा पूर्ण होईल.

डॉ.प्रीतम गेडाम
मोबाईल क्र.
८२३७४ १७०४१

# दोन हजार रुपयांची लाच घेताना भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिकाला रंगेहाथ पकडले

आरंभ मराठी | वाशी

मोजणी झालेल्या शेतजमिनीत हद्दीच्या खुणा करण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना वाशी येथील भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिक दिगंबर मारुती ढोले (वय ४५, मूळ रा. हदगाव, ता. पाथरी, जि. परभणी) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, ५५ वर्षीय तक्रारदाराच्या आईच्या नावे असलेल्या (गट क्र. ४४४) शेतजमिनीची मोजणी आणि हद्द कायम करण्यासाठी त्यांनी उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, वाशी येथे अर्ज दिला होता. त्यानुसार ७ मे २०२५ रोजी या जमिनीची मोजणी लिपिक दिगंबर ढोले यांनी केली होती. यानंतर त्यांनी शेतजमिनीच्या हद्द कायम खुणा करण्यासाठी तक्रारदाराकडे ३०००/- रुपयांची लाच मागितली होती.याबाबत तक्रारदाराने दिनांक २३ मे २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी दिनांक २६ मे रोजी पंचासमक्ष करण्यात आली असता, आरोपीने खरोखरच लाचेची मागणी करत असल्याचे स्पष्ट झाले. तडजोडीनंतर आरोपीने २००० रुपये घेण्यास तयार असल्याचे सांगितले. दोन हजार रुपये स्वीकारत असतानाच आरोपीला ताब्यात घेतले. आज (दि.२७) तक्रारदाराकडून पंचासमक्ष २०००/- रुपये लाच रक्कम स्वीकारताना आरोपी दिगंबर ढोले याला रंगेहाथ अटक करण्यात आली. आरोपीची घरझडती सुरू असून मोबाईलमधील डेटा तपासणीसाठी मोबाईल देखील ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यावेळी सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक विकास राठोड, सापळा पर्यवेक्षण अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक सिद्धाराम म्हेत्रे, पोलीस उपअधीक्षक, यांच्यासह आशिष पाटील, विशाल डोके, जाकेर काझी, दत्तात्रय करडे यांनी कारवाई केली. शासकीय कार्यालयांमध्ये कोणी लाच मागत असल्यास १०६४ या क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


# माता रमाई आंबेडकर यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

आरंभ मराठी | धाराशिव



त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतीदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले.माता रमाई यांच्या स्मृती दिनानिमित्त सामुदायिक मानवंदना घेउन मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जयाताई बनसोडे, सुनील बनसोडे, रमेश शेळके, अरुण बनसोडे, सुदेश माळाळे, कुंदन चिलवंत, अतुल लष्करे, राहुल गायकवाड,रमाई फाउंडेशनचे संस्थापक पृथ्वीराज चिलवंत, समता सैनिक सचिन दिलपाक, स्वराज जाणराव, छत्रपाल वाघमारे, नामदेव वाघमारे, अतुल लष्करे, अर्हतवीर चिलवंत आदी उपस्थित होते.

# व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची



ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी 'अंतर विद्यापीठीय खगोल व खगोलभौतिकी केंद्र' (आयुका) या संस्थेची स्थापना केली आणि तिच्या वाढीसाठी मोलाचे योगदान दिले. सुरुवातीला ही संस्था अगदी लहान होती. परंतु, आज ती जागतिक पातळीवर कार्यरत असलेली एक प्रतिष्ठित संस्था बनली आहे. भारतातील पहिला वेबपेज आयुकाचा होता. महाराष्ट्रात सर्वप्रथम आयुकामार्फतच ईमेल सेवा सुरू झाली. या संस्थेत नारळीकर सर्व सहकाऱ्यांना काम करण्यासाठी मोकळीक देत. संशोधनासाठी प्रोत्साहन देत. लोकांशी कसे वागावे, त्यांना कसे समजून घ्यावे, लोकांतील चांगुलपणा कसा वाढवावाहे ते सतत शिकवत असत.२० मे २०२५ रोजी डॉ. नारळीकरांचे निधन झाले. त्या दिवशी, खरंतर संस्थेला सुट्टी द्यायला हवी होती. मात्र, नेहमीप्रमाणे येथील अध्यापन व संशोधनाचे काम सुरूच होते. दोन महिने आधी डॉ. नारळीकरांनी आपल्या ब्लॉगमध्ये लिहिले होते की, ''संस्थापकाने संस्थेच्या उभारणीत मोठे योगदान दिले असेल, पण संस्थापक बाजूला झाल्यानंतरही ती संस्था कशी कार्यरत राहते, यावरच तिच्या यशाची खरी कसोटी ठरते.'' त्यांच्या निधनाच्या दिवशीही, आयुकामधील प्राध्यापक, संशोधक व कर्मचारी वर्गाने आपले काम चालू ठेवून त्यांना खरी श्रद्धांजली वाहिली. जे.आर.डी. टाटांनीही अशीच भावना व्यक्त केली होती. त्यांना भारतात निधन होणे नकोसे वाटत होते, कारण त्यांना वाटायचे की त्यांच्या मृत्यूच्या बातमीने सगळे आपले कामधंदे सोडून अंतदर्शनासाठी येतील, आणि हे त्यांना मान्य नव्हते. शेवटी, त्यांचे निधन स्वित्झर्लंडमध्ये झाले आणि त्या दिवशीही टाटा समूहातील सर्व कामे नेहमीसारखीच सुरू होती.'व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची' हा विचार कोणत्याही संस्थेच्या उत्कर्षाचा मूलाधार असतो. एखाद्या संस्थेत, संघटनेत, पक्षात किंवा कंपनीत अनेक लोक वेगवेगळ्या कौशल्यासह काम करत असतात. काही लोक संस्थेच्या उभारणीत योगदान देतात आणि ती सोडून जातात. तर, काही नवीन लोक येऊन आपापले योगदान देतात. संस्थेने ठरवलेल्या ध्येय-उद्दिष्टांप्रमाणे कार्य करणारे लोकच संस्थेच्या प्रगतीस कारणीभूत ठरतात. अनेकदा वैयक्तिक अडचणींमुळे लोक संस्था सोडतात, पण संस्था मात्र जागेवरच असते. तिचे कार्य अविरत चालू राहते. संस्थेच्या टिकावूपणामुळेच संस्थेतील प्रत्येक व्यक्ती व समाजाचा फायदा होतो. मात्र, हेवे-दावे, आळशीपणा, असूया, भ्रष्टाचार, अंतर्गत राजकारण व गटबाजी यांमुळे संस्था मोडकळीस येतात. ध्येयवाद न जपणारे, संस्थेपेक्षा व्यक्तीला महत्त्व देणारे लोक वाढले, तर संस्थेची आयुष्यमर्यादा कमी होते.संस्था ही सेवाभावी असो वा नफा मिळवणारी, तिच्या माध्यमातून सामाजिक हित साधले जाते. ''एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'' या संतवचनानुसार, जर संस्था टीमवर्कने कार्य करू लागल्या, तर त्या नक्कीच प्रगतीपथावर जातात. वैयक्तिक मतांपेक्षा सामूहिक निर्णयाला प्राधान्य दिल्यास संस्था लोकशाही पद्धतीने कार्य करू शकते. आपल्या मताला आग्रही असणे योग्य असले, तरी संस्थेतील बहुमताने घेतलेल्या निर्णयास पाठिंबा देणे हेही संस्थात्मक कामात आवश्यक असते. कोणत्याही संस्थेचा पाया हा सामूहिक विकासासाठी संघटित कार्य करणे हाच असतो. माणसामध्ये सहकार्याची, एकत्र राहून काम करण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असते. जर संस्था समतेच्या तत्त्वावर कार्य करू लागल्या, तर त्यामधून समाजाचेही हित साधले जाते. महाराष्ट्रात सहकारी संस्थांमधून सेवाभावाला नफ्यापेक्षा प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे सहकारी चळवळ ही सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणणारी शक्ती ठरली.वैयक्तिक हितापेक्षा सामूहिक हिताला प्राधान्य देणारेच लोक संस्थात्मक कार्यासाठी पात्र ठरतात. अशा कार्यासाठी इतरांबद्दल प्रेम, आदर, सेवाभाव, नेतृत्वगुण, नम्रता आणि विनय असलेले लोक गरजेचे असतात. तर, अहंकार, हुकूमशाही वृत्ती, हेकेखोरी आणि समरसता न राखणारे लोक संस्था मोडकळीस आणतात.''संस्थेने मझ्यासाठी काय केले?'' यापेक्षा ''मी संस्थेसाठी काय केले?'' याचा सतत विचार संस्थेतील प्रत्येकाने करावा. संस्थात्मक आणि संघटनात्मक कार्यातूनच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. एकट्याला अवघड वाटणारे काम समूहाने सहज शक्य होते. संघटनात्मक कामातून यश जलदगतीने प्राप्त होते. त्यामुळे संस्था टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत. आणि या सर्व गोष्टींच्या पाठीमागे असणारा मूलमंत्र असावा व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची!



किशोर
जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# देवगुज सांगे पंढरीसी यारे..!

या देशाचा धर्म सत्य आहे. जो धर्म अध्यात्म विज्ञानाची सांगड घालून पुढे जातो. जिथले राजे न्याय नीती मार्गाचे पाईक आहेत. ज्यांच्या पिढ्यान पिढ्या सत्य वचनावर आजन्म चालत आहेत.जिथे हरिभक्तीची मोठी परंपरा आहे, अशा पावन भूमीला आणि पवित्र कुळांना संतजन धन्य मानतात.

''पवित्र ते कुळ पावन तो देश
जेथे हरीचे दास जन्मती''

अशा पवित्र कुळांच्या पावन देशातील हरिभक्तांना संतजन विनवणी करतात.

''देवगुज सांगे पंढरीसी यारे
प्रेमचित्त घ्या रे नाम माझे
काया वाचा मने दृढ धरा जीवी
सर्व मी घालवी भार त्यांचा
भवसिंधू तारिण घ्या रे माझी भाक
लटके जरी नामयासी पुसा '

पांडुरंगाचे लडिवाळ भक्त पंढरपूर निवासी संतश्रेष्ठ नामदेव महाराजांचा संवाद परमात्मा पांडुरंगाशी चालायचा. या संवादांचे शब्द वर्णन अभंगातून नामदेव महाराज स्वतःचं व्यक्त करताना म्हणतात- माझी भक्ती करणाऱ्या भक्तांनी पंढरपूरला यावे. चित्तपूर्वक प्रेमाने माझे नाम घ्यावे व आपली पावले पंढरपूरकडे वळवावी. कंठात नाम साठवावे. सुंदर ते ध्यान असे स्वरूप नयनी साठवावे. जो हरीचा होतो त्याची सर्व दुः खें भगवंत त्रिविध तापातून मुक्तता करून भवसागरातून तारुण नेतात. हे सर्व पांडुरंग परमात्मा स्वतः संतश्रेष्ठ नामदेवांना बोलले आहेत. हे जर असत्य वाटत असेल तर नामदेवांना विचारा! अशा शब्दातला झालेला हा संवाद स्वतः नामदेव महाराज अभंगाच्या रूपाने लिहून ठेवतात.

पांडुरंग परमात्मा व संतश्रेष्ठ नामदेव यांच्याशी झालेल्या सुसंवादात संत नामदेव अभंगाद्वारे म्हणतात -आषाढी कार्तिकी विसरू नका मज सांगतसे गुज पांडुरंग '' ज्याप्रमाणे भक्तांना विठ्ठलाच्या भेटीची ओढ असते,अगदी तशीच आतुरता वैष्णवांच्या बाबतीत श्रीविठ्ठलाला सुद्धा होते. म्हणून तर संत तुकाराम महाराज मोठ्या अभिमानाने आणि विश्वासाने सांगतात.

' जावे पंढरीसी आवडी मनासी
कधी आषाढी कार्तिकी हे
तुका म्हणे ऐसे ज्याचे आर्त मनी
त्याची चक्रपाणि वाट पाहे '

भक्तांमुळे देवाला देवपण आलेले असते,म्हणूनच तर संत तुकाराम एका रचनेत म्हणतात -

' भक्तांची सोहळे देवाचिया अंगे
देव त्यांच्या संगे सुखभोगी
तुका म्हणे येथे नाही भिन्न भाव
भक्त तोचि देव देवभक्त '

ज्याचा भाव शुद्ध तो सहज भगवंताकडे वळतो. भगवंताला कुठले भक्त आवडतात हे संतांनी लिहून ठेवलेले आहे.

' आवडे देवासी तो एका प्रकारे
नामाचा गजर रात्रंदिन
तुळशी माळ गळा गोपीचंदन टीळा
हृदयी कळवळा वैष्णवांचा
आषाढी कार्तिकी पंढरीची वारी
साधन निर्धारी आण नाही
एका जनार्दनी ऐसा ज्याचा नेम
देवा तो परमपूज्य जगी '

जो वैष्णव उपरोक्त दंडक संहितेचे आचरण करतो . तो जगात परमपूज्यचं ठरतो. अशा भक्तांना भगवंत मुक्ती प्रदान करतात. संत ज्ञानेश्वर हरिपाठाच्या एक अभंगातून म्हणतात -

' देवाचिया द्वारी उभा क्षणभरी
तेने मुक्ती चारी साधियेल्या '

ह्या चार मुक्ती म्हणजे सलोकता,समीपता, स्वरूपता आणि सायुज्युता होय. या सर्व मुक्ती नामधारकाला जिवंतपणीच मिळतात. परंतु संत त्यांचाही अव्हेर करतात आणि भगवंताजवळ मागणी मागतात.

' मोक्ष तुमचा देवा दुर्लभ तो
तुम्ही ठेवा
मज भक्तीची आवडी '

अशा प्रकारे संत कायम भगवंत भक्तीची अभिलाषा बाळगतात.


शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ

# प्रेमाचं महत्त्व सांगणारी तुझ्याचसाठी!

## जान्हवी माने यांच्या कवितासंग्रहाचे रविवारी प्रकाशन

आरंभ मराठी | कोल्हापूर

कविता हा अंतरात्म्याचा आवाज असतो. कवी कवितेतून बोलत असतो. वाचक कवितामय होऊन वाचत असतो. याच वैशिष्ट्यावर प्रेम काय असतं, प्रेम कसं केलं पाहिजे, पती-पत्नीतील प्रेमाचा गोडवा कसा असावा, या सगळ्या प्रेमाच्या गोष्टी उलगडून सांगणारा कवितासंग्रह म्हणजे 'तुझ्याचसाठी'..! या कवितासंग्रह पुस्तकाचा प्रकाशन १ जून २०२५ रोजी कोल्हापुरातील हॉटेल वृषाली येथे होत आहे. हा माझा पहिलाचं कविता संग्रह असून नक्कीच महाराष्ट्रातील वाचकवर्गाला प्रेरणा देणारा ठरेल, अशी माहिती तुझ्याचसाठी कविता संग्रह पुस्तकाच्या लेखिका-कवी जान्हवी किशोर माने यांनी पत्रकार परिषदेत दिली. लेखिका-कवी जान्हवी किशोर माने या गृहीणी आहेत. त्यांना लहानपणापासून वाचन-लिखाणाची आवड आहे. त्यांनी प्रेमाचे महत्त्व सांगणारी 'तुझ्याचसाठी' ही कविता संग्रह पुस्तिका भाग्यश्री प्रकाशनाच्या माध्यमातून वाचकांसमोर आणली आहे. पुस्तक प्रकाशन खासदार धैर्यशील माने, महावीर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. गोपाल गावडे, ज्येष्ठ कवी साहित्यिक डॉ. चंद्रकांत पोतदार, दक्षिण महाराष्ट्र साहित्य मंडळाचे कार्यवाह डॉ. विनोद कांबळे, सारथी विद्यार्थी कृती समितीचे अध्यक्ष डॉ. संभाजी खोत, मणेर हायस्कूल इचलकरंजीच्या मुखाध्यापिका वैशाली कुलकर्णी आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या कविता संग्रह पुस्तिकेची प्रस्तावना यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णीचे मराठी विभागप्रमुख, कवी साहित्यिक डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी दिली आहे. कवी जान्हवी माने यांच्या कवितेत कवितेचा कोणताही मापदंड न लावता केवळ कविता आस्वादाने हे उचित ठरेल, अशी त्यांची प्रेम कविता आहे. कवितेच्या उदंड वाटचालीत प्रेमाच्या-विरहाच्या असंख आठवणींना घेऊन त्यांनी कवितेच्या प्रांतात पहिले पाऊल टाकले आहे. यावेळी किशोर माने, भाग्यश्री पाटील-कासोटे आदी उपस्थित होते.




# पाईप लाईनचे काम अर्धवट केल्याने जवळा येथील रस्ते झाले चिखलमय

आरंभ मराठी | जवळा (नि)



परंडा तालुक्यातील जवळा येथील शिवाजी नगर भागात घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी अतिशय निकृष्ट प्लास्टिक पिव्हिसी पाईप जमिनीत दिड ते दोन फूट खोदून रस्त्याची व सांडपाण्याची वाट लावली आहे. रस्त्यावर चेंबर टाकल्याने गल्लोगली वाहने नेता येत नाहीत. रस्त्याला डबक्याचे स्वरूप येत आहे. जवळा येथील मागील सहा महिन्याखाली घनकचरा व्यवस्थापन योजनेअंतर्गत गाव अंतर्गत सांडपाणी पाईपलाईनचे काम अर्धवट झाले आहे. त्यातच चेंबर फुटल्याने वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे व त्यामुळे रस्त्यावर पाणी साचू लागले आहे. याकडे संबधित अधिकाऱ्याचे व गुतेदाराचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. तरी वरिष्ठानी लक्ष घालून नागरिकांची होणारी गैरसोय थांबवावी अशी मागणी जोर धरत आहे.

# अर्पिता मुळे एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात सातवी

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलची विद्यार्थिनी अर्पिता नेताजी मुळे हिने महर्षी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ ,वैराग संचलित एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात ३०० गुणांपैकी ३६२ गुण घेऊन सातवा क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक राजेंद्र जाधव तसेच सर्व पदाधिकारी व या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक परमेश्वर कदम यांनी अभिनंदन करून तिला पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

# बापू घोंगते आणि श्रावण पवार यांचा सत्कार




आरंभ मराठी | तुळजापूर

शासनमान्य विद्युत ठेकेदार संघटनेच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी बापू घोंगते तर सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र धाराशिव जिल्हा सरचिटणीसपदी श्रावण पवार यांची नियुक्ती झाल्याबद्धल पुजारी नगर फाऊंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, उपाध्यक्ष उमाजी गायकवाड, सचिव अनिल आगलावे, कोषाध्यक्ष सोमनाथ पूजारी यांच्यासह रुतेश कवडे, राहुल जाधव, सिद्धेश्वर इंगोले, काशिनाथ राऊत, महेश पुजारी, वैभव ताटे, प्रतीक कांबळे, सौरभ राऊत, नागनाथ पुजारी आदी उपस्थित होते. याप्रसंगी तुळजापूर शहरात प्रथमच सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मोफत वधू-वर परिचय स्नेहमेळावा यशस्वी संपन्न केल्याबद्धल मुख्य संयोजक गणेश पुजारी यांचा ही कौटुंबिक सन्मान केला.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

बुधवार दि.28 मे 2025

# शिराढोणच्या आठवडी बाजारातील कठड्यांची दुरवस्था

## बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना बसण्यासाठीही करावा लागतोय संघर्ष

अमोलसिंह चंदेल | आरंभ मराठी

**शिराढोण-कळंब तालुक्यातील शिराढोण येथे दर शुक्रवारी मागील अनेक वर्षापासून आठवडी बाजार भरतो. या बाजाराचे पुर्वीपासूनच येथील दर्गाह परीसरात ठिकाण आहे. शिराढोण गावचे वैभव असणा-या आठवडी बाजारातील कठड्यांची अवस्था अतिशय खराब झालेली आहे. शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना बाजारात किमान सोयीसुविधा मिळाव्यात अशी अपेक्षा असते. शेतात कष्ट करणाऱ्या कष्टकऱ्यांना आपण पिकवलेला भाजीपाला बसून विकण्यासाठी देखील व्यवस्थित जागा उपलब्ध नाही. शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना बाजारात बसण्यासाठी देखील संघर्ष करावा लागत आहे.**

शिराढोण हे गाव तालूक्यातील राजकीय, व्यापारी, शैक्षणीक, सामाजिकदृष्टया सर्वात मोठे गाव म्हणून परिचित आहे. या गावात पोलीस ठाणे, आरोग्य केंद्र, शाळा, महाविद्यायल अस्तित्वात आहेत. या गावात परीसरातील २० ते २५ गावांतील लोकांची वेगवेगळया कामांसाठी रेलचेल असते. या गावाचे प्रमुख वैभव म्हणून गावात भरणा-या आठवडी बाजाराकडे गेल्या अनेक वर्षापासून पाहिले जाते. दर शुक्रवारी भरणा-या या आठवडी बाजाराच्या दिवशी संपूर्ण गावाला जत्रेचे स्वरुप येते. आठवडी बाजारामुळे संपूर्ण गावातील बाजारपेठ गजबजलेली दिसून येते व त्यामूळे गावातील व्यापा-यांची आर्थीक उलाढालही मोठया प्रमाणात होते. शिराढोणच्या या आठवडी बाजारात कळंब, ताडगांव, घारगांव, मुरुड, रांजणी, नायगांव, पिंपरी अशा अनेक शहरांतून तसेच ग्रामीण भागातून शेतकरी, व्यापारी आपला माल विकण्यासाठी येतात. या व्यापाऱ्यांना बाजारात बसण्यासाठी जे कठडे आहेत त्याची अवस्था अतिशय जिर्ण झाली असून येणा-या व्यापा-यांची मोठया प्रमाणा हेळसांड होत आहे. गावाचे वैभव असण-या या आठवडी बाजारातील कठड्यांची दुरुस्ती तसेच बाजाराची व्यापकता लक्षात घेता या कठड्यांमध्ये वाढ करावी आणि बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच व्यापाऱ्यांना बसण्यासाठी पुरेशी सोय उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होत आहे.



### दरवर्षी होतो बाजाराचा लिलाव

ग्रामपंचायतीमार्फत दर वर्षी या बाजारात पायाभुत सुविधा तसेच गावातील कांही विकास कामांसाठी बाजाराचा वर्षभरासाठी लिलाव केला जातो. हा लिलाव घेतलेला व्यक्ती बाजारात येणा-या व्यापारी तसेच शेतक-यांकडूंन जागेच्या आकारा नुसार १० ते २० रुपयांपर्यंत रक्कम वसूल करतात. बसण्यासाठी पुरेशी आणि योग्य जागा उपलब्ध नसताना देखील शेतकरी आणि व्यापाऱ्यांकडून जागेचे भाडे मात्र सक्तीने वसूल केले जाते. गोळा केलेल्या रकमेतून येथे सुविधा देणे गरजेचे आहे.



### कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे

शिराढोण येथे मोठया प्रमाणात भरणा-या आठवडी बाजारात कायमस्वरुपी पाण्याची सोय नसल्याने बाजारात आलेल्या व्यापा-यांना पाण्यासाठीही भटकंती करावी लागते. त्यामुळे ही भटकंती टाळण्यासाठी बाजारात कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. उन्हाळ्याच्या दिवसात शेतकऱ्यांचे आणि व्यापाऱ्यांचे पाण्यावाचून हाल होतात.

### बाजारात सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध होणार

शिराढोण येथे भरणाऱ्या आठवडी बाजारात सर्व पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रस्ताव तयार आहेत. यामध्ये कायम स्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्र बसवण्यात येणार आहे. तसेच आठवडी बाजारात येणा-या व्यापारी, शेतकरी यांची सोय व्हावी यासाठी जनसुविधा योजना व वित्तआयोग याच्या माध्यमातून कठडे तसेच निवारा म्हणून शेडचीही व्यवस्था करण्यात येणार आहे.

-लक्ष्मीताई म्हेत्रे, सरपंच, शिराढोण.

# भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा ॲड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड झालेल्या सिद्धिविनायक समूहाचे संस्थापक दत्ता भाऊ कुलकर्णी यांचा सत्कार रुपामाता उद्योग समूहाच्या समर्थनगर येथील कॉर्पोरेट कार्यालयात संपन्न झाला. हा सत्कार भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य आणि रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अँड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते करण्यात आला. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी धाराशिव जिल्ह्यात सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आपला ठसा उमठवला असून, आता राजकीय नेतृत्वाच्या माध्यमातून विकासाला चालना देणार असल्याचा विश्वास अँड. गुंड यांनी व्यक्त केला. या प्रसंगी अँड. नितीन भोसले, रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक अँड. अजित गुंड, रुपामाता मल्टीस्टेटचे कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, अर्बनचे कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले तसेच भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व रुपामाता समूहाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन मोहीमेसाठी सजग रहा

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात ५० लक्ष वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. १९ जुलै रोजी एकाच दिवशी २० लक्ष वृक्ष करण्याचे नियोजन केले असून, वृक्ष लागवडीशी संबंधित सर्व नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी यांनी आपआपल्या जबाबदाऱ्या वेळेत पार पाडाव्यात असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले. सोमवारी (दि.२६) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात वृक्ष लागवड वृक्ष संवर्धन मोहिमेच्या तयारीचा आढावा घेताना पुजार बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी सर्वश्री प्रवीण धरमकर, शिरीष यादव, उदयसिंह भोसले, संतोष राऊत, सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक करे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, मृदा व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रभाकर महामुनी, जिल्हा परिषदेचे जिल्हा जलसंधारण अधिकारी चंद्रकांत राऊळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सर्वश्री श्याम गोडभरले, सूर्यकांत भुजबळ, देवदत्त गिरी, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मोमीन, जलसंपदाचे कार्यकारी अभियंता मदने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुजार म्हणाले की, येत्या पावसाळ्यात जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे ते ठिकाण आधी निश्चित करावे. नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात जाऊन वृक्ष लागवडीबाबत संबंधित तालुका व शहरी यंत्रणांच्या बैठका घ्याव्यात, तसेच लागवडीपूर्व कामे करण्यात यावीत. शहरी भागातील वृक्ष लागवडीसाठी खुल्या जागांची निवड करावी




तसेच शहरी भागातील शाळांच्या परिसरात वृक्ष लागवड करावी. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. १९ जुलै रोजी ६२ हेक्टरवर २० लक्ष वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. गाव पातळीवर प्रत्येक गावातून ३०० व्यक्ती या वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होतील,असे सांगून पुजार म्हणाले की, ६ महिन्यानंतर वृक्ष लागवड मोहिमेचा आढावा घेण्यात येणार आहे. वृक्ष लागवड करताना कोणत्या ठिकाणी कोणते वृक्ष लावावे हे निश्चित करावे. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याची साठवणूक होऊन भूजल पातळी वाढवण्यासाठी जलतारा प्रकल्प मोठ्या प्रमाणात हाती घ्यावेत, शेतकऱ्यांना शेतात जाणे सोयीचे व्हावे तसेच शेतातील उत्पादित माल घरी किंवा बाजारपेठेत घेऊन जाणे सोयीचे व्हावे यासाठी अतिक्रमित रस्ते व पानंद रस्ते मोकळे करावे. पावसाळा सुरु होण्यापूर्वी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची कामे वेगाने पूर्ण करावीत, असेही निर्देश पुजार यांनी दिले.

# शहरात घरफोडी; साडेतीन लाखांचा मुद्देमाल चोरीला

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरात अज्ञात चोरट्यानी घरफोडी करत साडेतीन लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी मिनाज इसमोद्दीन शेख, (वय ४२ वर्षे, रा. शम्सपुरा फकीरा नगर ता. जि. धाराशिव) यांच्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दिनांक २४ मे रोजी रात्रीच्या वेळी तोडून आत प्रवेश केला. घरातील ५८ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५०,००० रुपये असा एकुण ३,४९,००० रुपये किंमतीचा माल माल चोरुन नेला.मिनाज शेख यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४),३०५ गुन्हा नोंदवला आहे.

# नारंगवाडी सबस्टेशन येथून दीड लाखांचा ऐवज चोरीला

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी सबस्टेशन येथून दीड लाखांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याची घटना घडली. दिनांक २४ मे च्या रात्री २२० केव्ही उपकेंद्र नारंगवाडी येथील तांब्याच्या धातुचे आयसोलेटर रॉड, १३२ केव्ही ०६ बे चे अर्थ आयसोलेटर रॉड कुण १८ नग, १३२ केव्ही टीबीक्स ३ नग असा एकुण १,४२,८०० रुपये किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. फिर्यादी राजकुमार पंडीतराव राउत (वय ४४ वर्षे, रा. उपकार्यकारी अभियंता १३२, के.व्ही. उपकेंद्र उमरगा महापारेषण उमरगा) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

# उमरगा तालुका विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आर्या गुरव, सुषमा गायकवाड, पुजा कोडलंगरे यांचा सत्कार




आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुका विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने एस.एस.सी बोर्ड परीक्षेत आर्या मनोजकुमार गुरव यांनी इंग्रजी माध्यमातून ९७ टक्के गुण मिळवून यश संपादित केल्यामुळे, तसेच सुषमा विनोद गायकवाड यांना जिल्हा परिषद धाराशिव च्यावतीने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि त्यांच्या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच पूजा कोडलंगरे यांचा टेट परीक्षा पास होऊन महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद शिक्षिका म्हणून नियुक्ती झाल्यामुळे विज्ञान मंडळाच्या वतीने शाल श्रीफळ फेटा देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विश्वजीत दुबे, विज्ञान मंडळाचे अध्यक्ष विनोद गायकवाड, कार्याध्यक्ष मनोजकुमार गुरव, सदस्य संतोष राठोड, संतोष शहापुरे, पांडुरंग आवटे, रवींद्र पोतदार त्यांची उपस्थितीत होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली वेदपाठक यांनी तर आभार दर्शना शाईवाले यांनी मानले.

# सायबर गुन्हेगारी, महिला सुरक्षेला प्राधान्य

## नूतन पोलिस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी पदभार घेतला

आरंभ मराठी | कोल्हापूर

नागरिकांनी तक्रारी देण्यासाठी निर्भिडपणे पुढे यावे, असे आवाहन करतानाच सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच महिला सुरक्षेला प्राधान्य देणार असल्याची ग्वाही नूतन जिल्हा पोलिसप्रमुख योगेश कुमार गुप्ता यांनी दिली.कोल्हापूरचे पोलिसप्रमुख महेंद्र पंडित यांची ठाणे पोलिस उपायुक्त म्हणून बदली झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी कोल्हापूरचे नूतन पोलिसप्रमुख म्हणून नांदेडचे नागरी हक्क संरक्षण पोलिसप्रमुख योगेश कुमार गुप्ता हे रुजू झाले. पोलिस मुख्यालयात मावळते पोलिसप्रमुख महेंद्र पंडित यांनी नूतन पोलिसप्रमुख योगेश कुमार गुप्ता यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यावेळी गेली दोन वर्षे आपण कोल्हापूर जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था



अबाधित राखण्याच्या दृष्टीने चांगल काम केले आहे. यापुढे जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थापन सुरळीत करणे, वाहन चोरीचे गुन्हे रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. शिवाय शहरातील पोलिस ठाण्यांच्या इमारतींचे नूतनीकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी नवीन पोलिसप्रमुख प्रयत्न करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# कोल्हापुरात आपचा शिंदे गटाला सवाल

## सगळेच तयार तर मग हद्दवाढीचे घोडे अडलेय कुठे?

आरंभ मराठी | कोल्हापूर

शहर हद्दवाढीचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे.कोणत्याही शहरी पायाभूत सुविधा उपलब्ध न करता शहराच्या भोवती वाढत चाललेले नागरिकरण धोकादायक आहे. त्यामुळे कोल्हापूर शहराची टप्याटप्याने हद्दवाढ करावी, अशी आम आदमी पार्टीची भूमिका आहे. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी ठरवले तर एका दिवसात हद्दवाढीची अधिसूचना निघू शकते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तर हद्दवाढ करा आणि मगच निधी मागण्यासाठी, या असे वक्तव्य केले होते. मित्रा संस्थेच्या बैठकीत मुख्यमंत्री



फडणवीस यांच्यापुढे याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती केली असता ते देखील हद्दवाढीबद्दल सकारात्मक आहेत असे आमदार राजेश क्षीरसागर यांचे म्हणणे आहे. सत्तेतील तिन्ही प्रमुख जर हद्दवाढ करायला हवी, असे म्हणत असतील तर नेमके घोडे अडलेय कुठे, असा सवाल आपचे प्रदेश संघटन सचिव संदीप देसाई यांनी केला. राज्यातील सत्तेचा वाटेकरी असणाऱ्या एका प्रमुख पक्षाचे, ज्यांचे नेते स्वतः नगरविकास मंत्री आहेत. अशा नेत्यांनीच निवडणुकीवर बहिष्काराची भाषा करणे हे हास्यास्पद आहे. त्यांनी थेट एकनाथ शिंदेंना भेटून निवडणुकीपूर्वी हद्दवाढ करण्याबाबत आग्रह करणे आणि न ऐकल्यास कोल्हापूरच्या हद्दवाढीसाठी नगरविकास मंत्र्यांच्या कार्यालयात ठाण मांडून बसण्याची भूमिका घेतली असती तर ती शहराच्या हिताची ठरली असती.शिवसेना (शिंदे गट) समन्वयक व स्थानिक आमदारांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याबाबत परस्पर विरोधी भूमिका घेतली. यातील नेमकी अधिकृत भूमिका कोणाची हे शहरातील मतदारांना त्यांनी सांगावे. सत्ता तुमची, नगर विकासमंत्री तुमचे तर मग एका पानाच्या अधिसूचनेसाठी एवढा ताकतुंबा का? आता एकनाथ शिंदे यांनीच हा ताकतुंबा थांबवून हद्दवाढ करावी.प्रभाग रचना करण्याचे महापालिकेला आदेश आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार हद्दवाढीसारखा निर्णय निवडणुकीच्या सहा महिने आधी घ्यावा लागतो. हद्दवाढीच्या आड लपून फक्त कोल्हापूरची निवडणूक पुढे ढकलण्याचा डाव असल्याचा आरोप करत निवडणुका बाकीच्या महापालिकांच्या सोबतच घ्याव्यात, अशी भूमिका आपने घेतली आहे.यावेळी शहराध्यक्ष उत्तम पाटील, सूरज सुर्वे, अभिजित कांबळे, मोईन मोकाशी, समीर लतिफ, विजय हेगडे, दुष्यंत माने, राकेश गायकवाड, संजय नलवडे, मयूर भोसले आदी उपस्थित होते.

# दिल्ली येथील नॅशनल लाठी अजिंक्यपद स्पर्धेत उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलला तीन सुवर्ण व एक कांस्यपदक

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी दिल्ली येथे आयोजित दुसऱ्या नॅशनल इंदोर मार्शल आर्ट गेम्स लाठी फडरेशन कप अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे २२ मे ते २५ मे २०२५ दरम्यान आयोजित अजिंक्यपद स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील मुलींनी तीन सुवर्णपदक व एक कांस्यपदक पटकावून जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून दिली. १६ वर्षाखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात प्रशालेतील ईश्वरी माने, श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ, या विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावले तर श्रुती जाधव या विद्यार्थिनीला कांस्यपदक मिळाले. गेल्या वर्षभरात उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गोवा



येथे झालेल्या पाचव्या राष्ट्रीय लाठी चॅम्पियनशिप चे विजेतेपद पटकावले आहे. तर जानेवारीमध्ये पिंपळनेर धुळे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तेंग सुडो शालेय क्रीडा स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण दोन रोप्य तर चार कांस्य पदके मिळवली आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक महंमद रफी शेख धनराज तेलंग यांचे मार्गदर्शन लाभले. एकाच वर्षात चार राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्याने धाराशिव जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष शिक्षणाधिकारी अशोक पाटील, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, शिक्षण तज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे उमरगा तालुक्यात सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# ॲड.व्यंकट गुंड यांचा भूतान अभ्यास दौरा, अनुभवातून मिळेल धाराशिवला नवदृष्टी

## उद्योगवाढीसाठी 'रुपामाता' सज्ज असल्याचा ॲड. गुंड यांचा विश्वास

आरंभ मराठी | धाराशिव

रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक तसेच भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड यांनी केलेल्या भूतान दौऱ्यानंतर जिल्ह्याच्या औद्योगिक आणि सामाजिक विकासासाठी नव्या दृष्टीकोनातून संकल्पना मांडल्या आहेत.भूतान मधील विविध औद्योगिक, कृषी व पर्यावरणस्नेही उपक्रमांचा सखोल अभ्यास करत त्यांनी धाराशिव मध्ये शाश्वत उद्योगांची उभारणी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. भूतानमध्ये प्राधान्याने पाहिल्या गेलेल्या ग्रॉस नॅशनल हॅपिनेस या संकल्पनेपासून प्रेरणा घेत तेथील लघुउद्योग,स्थानिक उत्पादने, हस्तकला, पर्यटन अशा क्षेत्रातील कार्यपद्धतींचा अभ्यास करत त्यांनी



धाराशिवसाठी योग्य मॉडेल तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा दौरा केवळ पर्यटन नव्हे, तर धाराशिवच्या प्रगतीसाठी नवा दृष्टीकोन घेऊन आला आहे. येथे स्थानिक उत्पादकता, शाश्वत विकास व सामूहिक सकारात्मकतेचा मंत्र आहे. हा अनुभव जिल्ह्यातील तरुण उद्योजकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे ॲड. गुंड यांनी सांगितले.या अनुभवातून प्रेरणा घेत त्यांनी नव्या उद्योगसंधी निर्माण करण्याचा, लघु व कुटीर उद्योगांना चालना देण्यासाठी योजनांची आखणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'रुपामाता उद्योग समूह'च्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्याला औद्योगिक स्वयंपूर्णतेकडे नेणाऱ्या वाटेवर पुढे नेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या दौऱ्यात मल्हारी माने, संजय पटवारी, यू.एन. भोसले,मनोहर सूर्यवंशी यांचा समावेश होता.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव....

बुधवार दि.28 मे 2025

# हरित धाराशिव मोहिमेसह विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव






धाराशिव जिल्ह्यात मान्सूनपूर्व तयारी करण्यासोबतच वृक्ष लागवड मोहिमेतून हरित धाराशिव करतांना सर्वांना सहभागी करून घेऊन विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.मंगळवारी (दि.२७) भूम येथील सावित्रीबाई फुले सभागृहात आपत्ती व्यवस्थापन, हरित धाराशिव यासह विविध योजनांचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी श्री.पुजार बोलत होते. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोकर, भूमच्या उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, भूम तहसीलदार श्री.पाटील व परंडा तहसीलदार श्री.कुकडे यांच्यासह दोन्ही तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक त्या खबरदारीच्या सूचना यावेळी श्री.पुजार यांनी तालुका प्रशासनाला दिल्या. तसेच विकास योजना, गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेसह जलतारा योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला.''प्रत्येक एकरासाठी एक जलतारा खड्डा'' हे उद्दिष्ट असल्याचे सांगून त्यानुसार कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. हरित धाराशिव मोहिम `अंतर्गत जिल्ह्यात ५० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे सांगून श्री.पुजार म्हणाले की, येत्या १९ जुलै २०२५ रोजी एकाच दिवशी १५ लाख वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे.यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीत शासकीय जमिनीपैकी किमान १० आर जमीन मशागत करून वृक्ष लागवडीसाठी तयार करावी तसेच या अभियानात नागरिक, बचत गट महिला, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत कर्मचारी, क्षेत्रीय कर्मचारी व सर्व विभाग प्रमुख यांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी यावेळी केले. रस्ते योजनांना चालना अभिसरणातून देण्यात यावी असे सांगून श्री.पुजार यांनी शेतरस्ते, पाणंद रस्ते, अतिक्रमणमुक्त मार्ग तयार करण्यासाठी जिल्ह्याचे २ हजार किमीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी ग्रामपंचायतीमार्फत ठराव घेऊन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.या योजनेंतर्गत लाभार्थ्यांचा वाटा ४८ हजार रुपये असून शासनाकडून प्रत्येकी १ किमी रस्त्यासाठी १ लक्ष रुपये अनुदान मिळणार आहे.शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असेही आवाहन श्री.पुजार यांनी केले.

# उमरग्यात महामार्गालगत गटारींचा अभाव; पावसासह नालीचे पाणी महावितरण कार्यालयात

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा येथील महावितरण कार्यालय, बसस्थानक परिसरातील ड्रेनेजलाइन ब्लॉक झाल्यामुळे रविवारी (दि.२५) रात्री तसेच सोमवारी (दि.२६) दुपारी व संध्याकाळी झालेल्या पावसानंतर पावसाचे तसेच घाण पाणी थेट महावितरण कार्यालयात घुसले. यामुळे कार्यालयातील अनेक विद्युत उपकरणे पाण्याखाली गेली असून, दुर्गंधीमुळे कर्मचारी व ग्राहक त्रस्त झाले होते. शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या गटारी बांधण्यात आलेल्या नाहीत. यामुळे उपजिल्हा रुग्णालय, श्री छत्रपती शिवाजी कॉलेजपासून बसस्थानक, महावितरण कार्यालयापर्यंत गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत आहे. गटार बांधकाम नसल्यामुळे याचा नागरिकांना त्रास होत असून, दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे. याबाबत उमरगा येथील महावितरण कार्यालयात रविवारी आणि सोमवारीही असे पाणी घुसले. नगरपालिका महामार्ग प्रशासनाकडे तर महामार्ग प्रशासन नगरपालिकेकडे बोट दाखवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अर्धवट ठिकाणी गटार बांधकाम सुरू असून पुर्ण क्षमतेने गटारी बांधकाम होत नाहीत. त्यामुळे विविध समस्या उद्भवत आहेत. दरम्यान सोमवारी सायंकाळी शहरात मोठा पाऊस झाला. यातच महावितरण कार्यालय, बसस्थानक परिसरातील ड्रेनेजलाइन ब्लॉक असल्यामुळे व हा भाग नदीच्या जवळ असल्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात घाण पाणी पावसाच्या पाण्याबरोबर बसस्थानकातून उमरगा महावितरण कार्यालय व बसस्थानक परिसरातील ड्रेनेजलाइन ब्लॉक असल्यामुळे पावसाचे व गटारीचे पाणी कार्यालयात व परिसरात घुसत आहे. यामुळे कार्यालयात व परिसरात गाळ व दुर्गंधी पसरली आहे. यावर्षी चार वेळा अशा घटना घडल्या आहेत. येथील ड्रेनेज तत्काळ दुरुस्त करून घेण्यात यावे अशी मागणी होत आहे. या वर्षात चार वेळा अशा घटना घडल्या आहेत. यामुळे महावितरण परिसरात दुर्गंधी पसरली असून, कर्मचारी व ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना पीक विम्यासाठी प्रीमियम म्हणून दरवर्षी भरावे लागणार तब्बल ७०० कोटी रुपये

## विमा अभ्यासक अनिल जगताप यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी, पाऊस, गारपीट, पूर, दुष्काळ, कीड, रोगराई यामुळे शेती पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना त्याची भरपाई मिळावी, त्याचहे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून सन २०१६ पासून राष्ट्रीय कृषी विमा योजना बंद करून प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरू करण्यात आली होती. प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकरी हिस्सा, राज्य शासनाचा हिस्सा व केंद्र शासनाचा हिस्सा असे मिळून एकूण रक्कम विमा हप्त्यापोटी पिक विमा कंपनीला दिली जाते. प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल, परिस्थिती काढणी पश्चात नुकसान व ती कापणी प्रयोगा आधारे शेतकऱ्यांना चार टप्प्यात नुकसान झाले तर त्याची नुकसान भरपाई मिळत होती. २०१६ पासून २०२२ पर्यंत या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी एकूण नुकसान भरपाई रकमेच्या दोन टक्के तर रब्बी हंगामासाठी दीड टक्के आणि फळबागासाठी पाच टक्के रक्कम शेतकरी हिस्सा म्हणून भरावी लागत होती. राज्य शासनाने २०२३ मध्ये केवळ एक रुपयामध्ये पिक विमा योजना आणली होती. ही योजना दोन वर्ष चालली त्याचा बऱ्यापैकी आर्थिक फायदा शेतकऱ्यांना झाला. कारण या दोन वर्षात त्यांना त्यांच्या हिश्याची रक्कम केवळ एक रुपया भरावी लागत होती. राज्य शासनाने या योजनेत भ्रष्टाचार होत असल्याचे कारण सांगून एक रुपयात पिक विमा योजना चालू खरीप हंगामापासून बंद केलेली आहे. त्याचा फटका आता शेतकऱ्यांना बसणार आहे. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी साधारणपणे ७०० कोटी रुपयेपेक्षा जास्तीची रक्कम प्रीमियम म्हणून भरावी लागणार आहे. चालू खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना आता केवळ कापणी ते काढणी या कालावधीत पीक कापणी प्रयोगावर आधारितच विमा नुकसान भरपाई मिळणार आहे.सन २०१८ पासून २०२४ पर्यंत खरीप व रब्बी हंगामात शेतकरी हिसापोटी शेतकऱ्यांनी भरलेला रकमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

### शेतकऱ्यांनी भरलेला आतापर्यंतचा पीकविमा प्रीमियम

वर्ष - शेतकरी संख्या- शेतकरी हिस्सा खरीप-रब्बी

२०१८ – ९५ लाख ३५ हजार – ४८७ कोटी – १२५ कोटी

२०१९ – १ कोटी २६ लाख – ५७६ कोटी – ३७ कोटी ३८ लाख

२०२० – १ कोटी ७५ लाख – ५३० कोटी – ४२ कोटी २८ लाख

२०२१ – ८३ लाख ९३ हजार – ४४० कोटी – ४८ कोटी ७३ लाख

२०२२ – ९६ लाख ६१ हजार – ६५६ कोटी – ३३ कोटी

२०२३ – १ कोटी ७० लाख – १ कोटी ७० लाख – ८३ लाख

२०२४ – १ कोटी ६५ लाख – १ कोटी ६५ लाख – ८० लाख.

# उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी सहकुटुंब घेतले श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन

आरंभ मराठी | तुळजापूर



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी मंगळवारी सकाळी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेऊन देवीच्या चरणी नतमस्तक होत कुलधर्म आणि कुलाचार पूर्ण केले. यावेळी न्यायमूर्ती सांबरे यांनी श्री तुळजाभवानी देवीची ओटी भरली. मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा देवीची प्रतिमा, कवड्यांची माळ आणि महावस्त्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी धाराशिवचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश स्वप्नील खाटी, तहसीलदार व व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे, जनसंपर्क अधिकारी गणेश निर्वळ, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रशांत जाधव, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पराडे, तसेच मंदिर संस्थानाचे कर्मचारी उपस्थित होते.

# प्रा. यशपाल भिंगे यांच्या चोराखळी येथील व्याख्यानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



आरंभ मराठी | येरमाळा

मल्हारराव होळकरांनी महिलांना जे स्वातंत्र्य दिले तसे आपणही आपल्या घरातील महिलांना स्वातंत्र्य दिले पाहिजे. महिला काय करू शकतात हे अहिल्यादेवींनी जगाला दाखवून दिले आहे असे गौरवोद्गार कळंब तालुक्यातील चोराखळी येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात प्रा. यशपाल भिंगे यांनी व्यक्त केले. सोमवारी (दि.२६) चोराखळी येथील जय मल्हार युवा प्रतिष्ठान आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या वतीने येथील पापनाश मंदीरातील सभागृहामध्ये व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारानंतर शाळेतील मुलींनी अहिल्यादेवींविषयी आपली मनोगते व्यक्त केली. यानंतर प्रा. भिंगे बोलताना म्हणाले की, धनगर समाजाने आपापसातील पोट शाखेतील मतभेद मिटवले पाहिजेत. आपण सर्व एकच आहोत. मुला – मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन जबाबदार नागरिक बनवा. मुलं व्यसनी बनणार नाहीत असे संस्कार त्यांना लहानपणापासूनच द्या. अहिल्यादेवींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला तर जीवनातील कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची ताकद तुमच्यात निर्माण होईल. व्याख्यानानंतर गावातील विविध परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमावेळी डॉ. रामकृष्ण लोंढे, प्रा. सोमनाथ लांडगे, कमलाकर दाने, प्राचार्या श्रीमती पैकेकर मॅडम, कवडे सर, दिगंबर मैंदाड, खंडेराव मैंदाड, सीमाताई सोनटक्के, गोपीनाथ मैंदाड, विश्वंभर मैंदाड, ॲड. रविंद्र मैंदाड, ॲड. श्रीकांत मैंदाड, चंद्रकांत कोकाटे, बाजीराव चौरे, ॲड. वाघमारे, मिराजी मैंदाड,ह.भ.प. नामदेव वाघमोडे, तुळशीदास मैंदाड, भुजंग लोकरे, आझाद शेख, नागनाथ साचणे, पांडुरंग मैंदाड, झेलम शिंपले, विठ्ठल खटके, अभिमान लिखे, अमोल मैंदाड, श्रावण इटकर, अंबादास शिंदे, काकासाहेब सोनटकके, संभाजी मैंदाड, अजित गायके, नागेश मैंदाड, बंटी मैंदाड, ज्योतीताई जगताप, राणी शिंदे, सुनिता स्वामी, रणरागिनी झेलम, ॲड. वाघमारे ताई, ॲड. छाया मैंदाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सोमनाथ लांडगे यांनी केले. सुत्रसंचालन संजय नवले यांनी आभार प्रदर्शन गोपीनाथ मैंदाड यांनी केले.

# बस सुरू करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तवलेंचे उपोषण

## सकल मराठा समाज मुरुडच्या वतीने आंदोलनाला जाहीर पाठिंबा

बालाजी मुळे | आरंभ मराठी

मुरुड –लातूर येथील मध्यवर्ती बस स्थानकातून मुरुड अकोला ,बोरगाव, मुरुड, ढोकी, धाराशिव, येडशी, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी जाणाऱ्या बस सुरू करण्यात याव्यात, अन्यथा एस टी महामंडळ वर्धापन दिनी रविवार १ जून २०२५ रोजी सकाळी १० वा. १० मिनिटांपासून लातूरला दयानंद गेट चौक येथे लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. लातूर येथील मध्यवर्ती बस स्थानकातून मुरुड आकोला, बोरगाव (काळे), मुरुड ,ढोकी येडशी ,धाराशिव, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी जाण्यासाठी बस सेवा सुरळीत सुरू होती. परंतु मध्यवर्ती बस स्थानकाचे कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू झाल्यानंतर रेनापुर नाका येथील नवीन बस स्थानकातून या गावांसाठी बस सेवा सुरू करण्यात आल्या. जुन्या अथवा पूर्वीच्या मध्यवर्ती बस स्थानकाचे काम पूर्ण होऊन दोन महिने झाले आहेत, तरीही गावाला जाणाऱ्या बसेस नवीन बस स्थानक रेनापुर नाका येथील गैरसोयीचे असणाऱ्या बस स्थानकातून सुटत आहेत.मध्यवर्ती बस स्थानका शेजारी गंजगोलाई, शैक्षणिक संकुल, व्यापारी संकुल, भाजी मार्केट, वैद्यकीय सुविधा, शैक्षणिक संकुल हे जवळ आहे. त्यामुळे या भागातील लोकांसाठी मध्यवर्ती बस स्थानक सोयीचे आहे. नवीन बस स्थानकातून सदरील गावांना जाणाऱ्या बस सुटत असल्यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे ,तसेच






आर्थिक भुर्दंड प्रवाशावर बसत आहे. नवीन बस स्थानकातील बस छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गे औसा, निलंगा, सोलापूर जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी होत आहे. प्रवाशांची व विविध सामाजिक संघटना यांची सदरची मागणी असून सुद्धा प्रशासकीय स्तरावर कोणताच निर्णय घेतला नाही . प्रशासनाने पूर्वीप्रमाणे मध्यवर्ती बस स्थानकातून मुरुड अकोला, बोरगाव (काळे) मुरुड, धाराशिव, येडशी, बार्शी पुणे, मुंबई या ठिकाणी जाणाऱ्या बसेस दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत सुरू कराव्यात. अन्यथा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापनदिनी म्हणजेच १ जून २०२५ वार रविवारी सकाळी १० वाजून १० मिनिटांपासून दयानंद गेट चौक, लातूर या ठिकाणी लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असे पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे .

# सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले यांनी सहकुटुंब घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन



आरंभ मराठी | तुळजापूर

धाराशिव जिल्ह्यातील सरपंच प्रतिनिधी यांची सरपंच परिषद ही संघटना वाढवण्यासाठी बहुमूल्य साथ लाभली असून, परिषदेच्या माध्यमातून राज्यभरातील सरपंच, उपसरपंच यांच्या समस्या असतील किंवा गावविकासाच्या शासकीय स्तरावरील अडचणी सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे मत सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले यांनी व्यक्त केले. प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले यांनी सहकुटुंब श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर तुळजापूर येथे सरपंच परिषदेची राज्यस्तरीय बैठक सर्किट हाऊस येथे संपन्न झाली. याप्रसंगी सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा जिनत सय्यद, प्रदेश संघटक कोहिनूर सय्यद, राज्य प्रसिद्धी प्रमुख अनिल आगलावे, सोशल मीडिया प्रमुख प्रा.सतीश मातणे, धाराशिव जिल्हाध्यक्ष सुजीत हंगरगेकर, जिल्हा उपाध्यक्ष किरण व्हरकट, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब जेवे, तुळजापूर तालुकाध्यक्ष संजय गुंजोटे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमर माने, जिल्हा कार्यकारणी सदस्य जयसिंग बोराडे, तानाजी पाटील, गौरीशंकर कोडगिरे, सिद्धेश्वर इंगोले, सोमनाथ पूजारी आदी उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना जितेंद्र भोसले म्हणाले की, गावहित आणि गावविकास डोळ्यासमोर ठेवून सर्व सरपंच यांनी आपले सेवाकार्य करावे. धाराशिव जिल्हाध्यक्ष सुजीत हंगरगेकर यांनी सरपंच प्रतिनिधी यांच्या गाव आणि तालुका पातळीवर सर्व समस्याबाबत मत मांडले. भविष्यात सरपंच परिषद सक्षम आणि परिषदेचा विस्तार मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल असा विश्वास प्रदेशाध्यक्ष यांना यावेळी दिला.